Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ८० • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१३ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## जर सरकार ऐकत नसेल तर युवाशक्ती काय करु शकते ? हे सरकारला देखील समजेल–शरद पवार

**नागपूर–जर सरकार ऐकत नसेल तर युवाशक्ती काय करु शकते ? हे सरकारला देखील समजेल, असा इशारा शरद पवार यांनी दिला. युवा संघर्ष यात्रेच्या सांगता सोहळ्यात ते नागपूरात बोलत होते.शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, या देशामध्ये काळ्या आईशी ईमान राखणारा हा शेतकरी त्याची संकटे दूर करण्यासाठी अनेक कार्यक्रम हे संघर्ष यात्रेतून झाले आहे. आरक्षणाचा प्रश्न मराठा, धनगर, लिंगायत आरक्षण यावर चर्चा झाली. त्यामुळे या तरुणांना मी धन्यवाद देतो, असे शरद पवार म्हणाले. त्यामुळे ही यात्रा अत्यंत महत्त्वाची आहे.**

मी देखील यात्रा काढली, जळगाव ते नागपूर पर्यंत काढली. तेव्हा अमरावती जिल्ह्यात पोहरा या ठिकाणी अटक झाली. यशवंतराव चव्हाण यांना प्रश्न विचारला. तुम्ही एसटीत कधी बसले का? त्यानंतर पोलिसांनी आज मला पोलिसांनी बसवले. काही यात्रा इतिहास घडवत असतात. सामुदायिक शक्तीपुढे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना झुकावं लागलं होतं.ही पळपुट्यांची नव्हे लढणाऱ्यांची सभा, मध्यप्रदेशची हवा या महाराष्ट्राला लागणार नाही, २०२४ मध्ये पुन्हा महाविकास आघाडी सरकार स्थापन होईल, असे संजय राऊत म्हणाले. संघर्ष करणाऱ्यांची मैत्री पक्की असते, मी बाळासाहेबांच्या ठाकरेंचा शिवसैनिक आहे. तर मी शरद पवार यांचा देखील चेला आहे. असे राऊत म्हणाले. आता देश सांगतो की, 'मोदी आया तो देश गया', आपल्याला सावध पणे पुढची पावले टाकायची आहे. हा महाराष्ट्र चुक करणार नाही. आमचे पक्ष फोडता, आम्ही तुम्हाला फोडणार, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला. इंडिया आघाडी म्हणून आम्ही एकत्र राहू आणि मोदींना उत्तर देऊ या, असे आवाहन देखील राऊत यांनी दिली.माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, शरद पवार साहेब यांचे वय झालं तरी नव्या संघर्षाची सुरुवात पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली रोहित पवार यांनी सुरु केले आहे. रोहित पवारांनी यांनी जे प्रश्न मांडले ते योग्य आहे. या देशातील युवक व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता आम्ही सातत्याने एकत्र काम करु, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.आजचे सरकार कॅश आणि कॅरी सरकार चालू आहे. अजूनही एकनाथ शिंदे सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जाग आली नाही. या सरकारला लवकरात लवकर घालवलं पाहिजे, सत्तेमध्ये परिवर्तन केले पाहिजे, असे आवाहन पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.सरकार शिक्षण, आरोग्यावर गांभीर्याने घेत नाही. ६० लाख कोटींचे कर्ज या राज्यावर झालं तरीही हे सरकार कसे चालेल हा प्रश्न कायमच आहे. हे फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार चालवणारे सरकार आहे का, असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रश्न उपस्थित केला.व्यवसाय करावा तर जीएसटीला सामोरे जावे लागते.जयंत पाटील म्हणाले की, कोणताही व्यवसाय करायची असेल तर तरुणांना जीएसटीला सामोरे जावे लागते. युवकांचे प्रश्न घेऊन काम करणारे नेते म्हणून रोहित पवार, रोहित पाटील समोर आले आहेत. त्यांचे मी अभिनंदन करतो.आमदार अनिल देशमुख म्हणाले की, शेतकऱ्यांचे प्रश्न काढले की, हे सरकार घाबरते, कारण या सरकारने परदेशातून कापूस आयात केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळत नाही. त्यासाठी या सरकारला प्रश्न विचारायचे आहे. संत्र्याला भाव नाही, सोयाबीनला भाव नाही. हे सरकार काय करताहेत.२०१३ रोजी विरोधी पक्षात असलेले देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, सोयाबीन, कापसाला चांगला भाव दिला. कपाशीला १४ हजार तर सोयाबीनला ८ हजार भाव दिला पाहिजे. त्यामुळे



लाव रे तो व्हिडिओ स्टाईल वापरुन काय म्हणाले होते. हे सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करणारे हे सरकार आहे. खोटं आश्वासन देणारे हे सरकार आहेत. पन्नास खोके देऊन शिवसेनेचे आमदार फोडले. आता ईडी सीबीआयच्या भीतीने हे आमचे राष्ट्रवादी फोडली. त्यामुळे हे सरकार फोडाफोडीचे राजकारण करत आहे. हा सिंचन घोटाळा आमचं सरकार पूर्ण करेल असे म्हणणारे देवेंद्र फडणवीस याचं काय अवस्था काय झाली आहे.अनेक लोकांनी मला प्रश्न केला? ही युवा संघर्ष यात्रा कशासाठी, जि.प. सदस्य ते आमदार झालो. सातत्याने विद्यार्थी, युवांचे प्रश्न मांडले. एमपीएससी परीक्षेतील भ्रष्टाचार मांडला. तर शासनाकडे मला उत्तर आले की, आजची पिढी गंभीर नाही. म्हणजे तुमची आमची लेकरं पिढी गंभीर नाही, असे सरकार म्हणते.काही पत्रकारांनी घोटाळा पुढे आणला तर त्यावर सरकार म्हणते की, त्या पत्रकारावर हक्कभंग आणू. म्हणून मी हताश झालो. त्यानंतर मी शरद पवार यांना विचारलं काय केले पाहिजे. त्यासाठी त्यांनी सांगितले की, तुम्हाला संघर्ष करावा लागेल. त्यासाठी आम्ही युवा संघर्ष यात्रेची सुरुवात दिली. टीकेला आम्हाला महत्त्व देत नाही. त्यांच्या टीकेला भाव काय भिख देखील देत नाही. पाय दुखले, फोड आले पण लोकांमध्ये जायचो, युवकांमध्ये जायचो तेव्हा ते संघर्ष दु:ख सांगायचो. तेव्हा सर्व विसरुन जायचो.युवकांच्या अनुभवावरुन आमचं संघर्ष काहीच अर्थ नाही. शेतकऱ्यांचा संघर्ष ऐकून घेताना आम्हाला आमचं दु:ख खूप कमी आहे. यावर अधिवेशनात चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी रोहित पवार यांनी सभेत केली. या सभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार, काँग्रेस नेते दिग्विजय सिंह, पृथ्वीराज चव्हाण, ठाकरे गटाचे नेते तथा खा. संजय राऊत, आमदार अनिल देशमुख व आदी मान्यवरांची उपस्थिती आहे.रोहित पवार म्हणाले की, आमच्या शेतकऱ्यांना काय फक्त फाशी घ्यायची का?, एक रुपयाचा विमा देऊ नका, आम्हाला एक रुपया घ्या, दोन रुपया घ्या, पण जेव्हा गरज आहे तेव्हा आम्हाला मदत करा, अशी मागणी शेतकऱ्यांनी सांगितले आहे.दंगल होते तेव्हा गरीबांचेच लोक मरतात, त्यांच्याच डोक्यात दगड पडतात. तर जे घडवून आणतात ते निवांत घरात बसतात, असा त्यामुळे सर्वांना आवाहन आहे की, त्यांनी स्वाभीमानाने जगायला शिका, जातीयवादाचे राजकारण महाराष्ट्रात अजिबात नको, युवकांनी अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करून योग्य विचारांच्या पाठिमागे पुढे रहा, अशी मागणी त्यांनी केली. आपल्या मागण्यांची दखल घेतली नाही तर आम्ही सर्व मोर्चा आता विधिमंडळावर घेऊन जाणार आहोत, असा इशारा रोहित पवार यांनी दिला.शेतकऱ्यांच्या कापुस, सोयाबीन, धान, संत्रा, तुर व इतर शेतमालास योग्य भाव द्या, पिक विमा योजनेचा फायदा शेतकऱ्यांना देण्यात यावा, अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्या, राज्यातील विविध खात्यातील रिक्त पदे त्वरित भरा, महिला सुरक्षेसाठी शक्ती कायदा लागु करा, कंत्राटी नोकरभरती रद्द करा, ड्रग्जच्या विळख्यात अडकत चाललेल्या तरुणाईला वाचवा, जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, शाळा दत्तक योजना रद्द करा, समुह शाळा योजना रद्द करा, या व इतर मागण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आ. रोहीत पवार यांनी ही युवा संघर्ष यात्रा काढली आहे.

## महिलांसाठी कराटे प्रशिक्षण अत्यंत गरजेचे – डॉ.अंकुश आगलावे

**भद्रावती । प्रतिनिधी**

महिलांसाठी कराटे प्रशिक्षण अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन ऐलन थीलक सितो–यु कराटे स्कुल ऑफ इंटरनॅशनल शाखा चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष सेंसई डॉ. अंकुश आगलावे यांनी भद्रावती येथील सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग मधील कार्यक्रमात केले.कराटे प्रशिक्षण महिलांनी स्वरक्षणासाठी घेणे अत्यंत उपयोगी असून कोणतीही अनुचित घटना महिलांच्या बाबतीत घडू नये याकरीता कराटे प्रशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे सेंसई डॉ. अंकुश आगलावे यांनी भद्रावती येथे आयोजित तीन दिवसीय कराटे ट्रेनिंग मध्ये सांगितले.या सेल्फ डिफेन्स ट्रेनिंगचे आयोजन सेंसई डॉ. आगलावे ब्लॅक बेल्ट २ डॉन तथा रेंसी दुर्गाराम रामटेके ४ डॉन




यांनी केली. या ट्रेनिंगमध्ये ५०० प्रशिक्षणार्थ्यांनी भाग घेतला. तथा विजयी प्रशिक्षणार्थ्यांना ब्लॅकबेल्टचे वितरण करण्यात आले. सेंसई डॉ. आगलावे यांनी हंसी पी कुमार यांचा ग्रामगीता व भगवी टोपी देवून सत्कार केला. सदर्हू ट्रेनिंग हंन्सी पी सुनील कुमार ब्लॅक बेल्ट ८ डॉन केरला यांचे मार्गदर्शनात घेण्यात. यावेळी सेंसई डॉ. आगलावे यांचा सत्कार हन्सी पी कुमार यांची स्मृतीचिन्ह देवून केला. यावेळी सिहान मनीष सारडा , सेन्सई प्रा. दुसंत नगराळे, तथा कराटे मास्टर यांनी कार्यक्रमाला यशस्वी केले.

## भाजप महाराष्ट्र अल्पसंख्याक आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी अहेतेशाम अली

**वरोरा । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर भाजपने पदाधिकारी नियुक्त्यांचा धडका लावला आहे. जिल्हा, ग्रामीण अध्यक्षांसह कार्यकारणीची निवड प्रक्रिया रखडली असली तरी राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात येत आहेत.भाजप अल्पसंख्याक आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी अहेतेशाम अली यांची निवड करण्यात आली आहे.



वरोरा नगरपालिकेचे मा.नगराध्यक्ष तथा भाजप जिल्हा सचिव अहेतेशाम अली यांना भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी मुंबई येथे झालेल्या भाजपाच्या बैठकीनंतर नियुक्ती केली. अहेतेशाम अली हे गेल्या ९ वर्षापासून भाजपमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी २०१६ मध्ये नगरपालिकेच्या निवडणूकीत नगराध्यक्ष सह नगरसेवक निवडून आणले होते.वरोरा नगरपालिकेवर भाजप सत्ता स्थापन यश मिळवलेले होते.अहेतेशाम अली यांचा कार्यकाळामध्ये वरोरा शहराचा सर्वाधिक विकास झाला. शहरातील सर्व मुख्य रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यात आले. शहरात हायमास्ट लाईट आणि डेकोरेटिव्ह पोल बसविण्यात आले. मानवी जीवन निरोगी रहावे म्हणून काही वार्डात वाटर एटीएम बसविण्यात आले. वरोरा नगरपरिषदे ला स्वच्छता सर्वेक्षणात प्रथम क्रमांक मिळाले होते.अहेतेशाम अली यांच्या वर पक्षाने आता त्यांना बढती देत त्यांच्यावर अल्पसंख्याक आघाडीच्या उपाध्यक्ष पदाची ची जबाबदारी सोपवली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्यावर टाकलेला विश्वास आपण सार्थ ठरवू, अशी प्रतिक्रिया अहेतेशाम अली यांनी दिली.

### आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रयत्नांना यश

## वरोरा तालुक्यातील महत्वाच्या रस्त्याला २६४.५३ कोटी मंजूर

**वरोरा । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील कोसारा - सोईट - मुधोली - वरोरा पावना - वेळगाव - चंदनखेडा - मोहुर्ली रामा - ३७१ किमी ७/१५५ ते ४०/२०५ (एकूण लांबी = ३३.७० ) रस्त्याची सुधारणा करणे (भाग - कोसारा - वरोरा - पावना) या रस्त्याला आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या पाठपुराव्याने एशियन डेव्हलपमेंट बँक (ए डी बी ) अंतर्गत २६४.५३ करोड रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी, व्यापारी वर्गासाठी, ग्रामस्थांनी तसेच विद्यार्थ्यांसाठी मोठा प्रश्न मार्गी लागला आहे.या रस्त्याची लांबी ३३.७० किलोमीटर आहे. हा रस्ता वरोरा तालुक्यातील कोसार, सोईट , मुधोली, वरोरा पावना , बेलगाव , चंदनखेडा, मोहुर्ली या गावांमधून जातो. हा रस्ता अतिशय खराब अवस्थेत होता. या रस्त्यावरून वाहतूक करणे कठीण होते. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांपासून ते व्यापारी वर्गापर्यंत अनेकांची होती. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील व ताडोबा जाणाऱ्या प्रवाशांना या मार्गामुळे प्रवास करणे सुलभ होणार आहे. या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी तत्कालीन दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्यासोबत सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानंतर आमदार प्रतिभा धानोरकर यांनीही हा प्रश्न लावून धरला होता. या रस्त्याकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. त्यानंतर आमदार प्रतिभा धानोरकर यांनी सुद्धा हा प्रश्न लावून धरला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून या रस्त्याला ए डी बी अंतर्गत २६४.५३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.या रस्त्याची दुरुस्ती झाल्यानंतर वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांना, व्यापारी वर्गाला तसेच विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. या रस्त्यावरून वाहतूक करणे सोपे होईल. त्यामुळे या परिसरातील विकासाला चालना मिळेल.



## शिक्षितांना निवडुण दिले तर देशाचे भविष्य उज्वल होणार - डॉ.अंकुश आगलावे

### डॉ.आगलावे श्री क्षेत्र हनुमान देवस्थानास जगन्नाथ महाराजांची मुर्ती भेट देणार



**वरोरा । प्रतिनिधी**

शिक्षितांना निवडुण दिले तर खऱ्या अर्थाने देशाचे भविष्य उज्ज्वल होणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मानवाधिकर संगठन चे विदर्भ प्रदेश अध्यक्ष तथा गुरूदेव प्रचारक डॉ. अंकुश आगलावे यांनी अखंड हरिनाम व श्रीराम कथा प्रसंगी सुमठाना येथे केले.वरोरा तालुक्यातील सुमठाना गट ग्रामपंचायत अंतर्गत श्री क्षेत्र हनुमान देवस्थान, येथे अखंड हरिनाम व श्रीराम कथा सप्ताह प्रसंगी डॉ. अंकुश आगलावे यांनी देवस्थानास श्री सदगुरू जगन्नाथ माउलीची संगमरवरने बनलेली मुर्ती भेट देण्याची घोषणा यावेळी केली.डॉ. आगलावे यांनी चंद्रपूर व यवतमाळ जिल्हयात जवळपास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अकरा व जगन्नाथ महाराजांच्या सातहून अधिक मुर्त्या विविध मंदीर व देवस्थान भेट दिल्या आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय, रा.सं.तुकडोजी महाराजांचे प्रचारक, भागवतकार व किर्तनकार यांचा सत्कार डॉ. आगलावे तर्फे होत असते. यावेळी गुरूदेव प्रचारक व मानवाधिकार संगठनचे पदाधिकारी व समस्त ग्रामवासी उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



## संपादकीय

# तापमान बदल आणि पिके



वाढते तापमान व अवर्षणात मक्यासारख्या पिकाच्या उत्पादनावर काय परिणाम होतात, यासंबंधी आफ्रिकेत सध्या आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांच्या मदतीने चाचण्या सुरू आहेत. उत्पादनवाढीच्या साह्याने अन्नसुरक्षा मिळवण्यासाठी अशा अभ्यासांची मोठी गरज शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.मेक्सिको येथील आंतरराष्ट्रीय गहू व मका सुधार केंद्र व भागीदारी संस्थांनी अर्ध सहारा - आफ्रिकेतील हवामानात मका उत्पादनाच्या १९९९ ते २००७ या कालावधीत चाचण्या घेतल्या आहेत.सुमारे २० हजार चाचण्यांसहित विविध केंद्रांमध्ये हवामानाची संपूर्ण आकडेवारीही नोंदवण्यात आली आहे. या संशोधन प्रकल्पात संशोधकांना असे आढळले, की तापमानात एक अंश सेल्सिअस एवढी वाढ जरी झाली, तरी आफ्रिकेतील सध्याच्या मका पट्ट्यातील पिकात योग्य पर्जन्यमान असूनही ६५ टक्के नुकसान होऊ शकते. अवर्षण परिस्थितीत संपूर्ण मका पट्ट्यात नुकसान झालेले आढळले आहे. आकडेवारीत सांगायचे तर, एक अंश जरी तापमान वाढले, तरी ७५ टक्क्यांहून अधिक क्षेत्रात उत्पादनात किमान २० टक्के घट येऊ शकते, असा निष्कर्ष मिळाला आहे.सिमीट संस्थेतील संशोधन विभागाचे उपमहासंचालक व या अभ्यासप्रकल्पातील शास्त्रज्ञ मॅरिएन बँझीगर म्हणाल्या, की हे परिणाम आमच्यासाठी आश्चर्यकारक आहेत. कारण मका हे अधिक तापमान सहन करणारे पीक आहे, असे आम्ही गृहीत धरून चाललो होतो. ३० अंशांहून अधिक तापमानात मका हे पीक अधिक काळ राहिल्यास उत्पादन तेवढे घटण्यास मदत होते. त्यात अवर्षण आणि उष्णता या गोष्टी जर एकत्र आल्या, तर परिणाम अधिक तीव्र होतो. साहजिकच आफ्रिका, आशिया किंवा मध्य अमेरिका आदी देशांमध्ये हवामान बदलाचे असे परिणाम अधिक जाणवणार असल्याची शक्यता जाणवते. जगासाठी अन्नधान्याची गरज वाढत असताना ही आव्हाने आपल्यापुढे असल्याचे दिसून येत आहे.आफ्रिकेतील शेतकऱ्यांना चांगल्या जाती उपलब्ध करून देण्यासाठी पिकांच्या चाचण्या पूर्वीपासूनच घेतल्या जात आहेत. मात्र, यापूर्वी अशा चाचण्या घेताना तेथील हवामानाच्या नोंदी, त्याच्या घटकांचा उत्पादनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास फार झाला नसल्याचे संबंधित तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्या चाचण्या केवळ पिकांवर हवामान बदलाचा होणारा परिणाम अभ्यासण्याव्यतिरिक्त वेगळ्या उद्दिष्टांसाठीच घेण्यात आल्या होत्या.भारत, चीन, ब्राझील यांसारख्या देशांमध्ये विविध प्रकारचे हवामान उपलब्ध असल्याने तेथील चाचण्यांचा तुलनात्मक डाटा' महत्त्वाचा ठरणार आहे. खासगी कंपन्या देखील अशा प्रकारचे संशोधन करीत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.मात्र, येत्या काळात हवामानातील बदलांचा पिकांवर कशा प्रकारे परिणाम होत आहे, या विषयावरील अधिकाधिक माहितीचे संकलन अशा चाचण्यांमधून होत राहणार असल्याचा आशावादही या शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.सीताफळाचा गर सर्वांनाच आवडतो, परंतु सध्या या फळामध्ये असलेल्या बियांमुळे त्याचा गर काढायचे काम वेळखाऊ आहे. ही अडचण लक्षात घेऊन अमेरिका आणि स्पेनमधील शास्त्रज्ञ बीनबियाची सीताफळाची जात विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. युसी. डेव्हिस येथील वनस्पतिशास्त्र विषयातील तज्ज्ञ चार्लीस गेसीर म्हणाले, की बीनबियाच्या सीताफळाची जात विकसित झाली तर फळांच्या उत्पादनाच्यादृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. स्पेनमधील तज्ज्ञ सध्या शुगर ऍपल या बीनबियांच्या फळांसंबंधी अधिक संशोधन करीत आहेत. शुगर ऍपल हे फळ सीताफळाच्या कुळातील आहे. शुगर ऍपल या फळाबाबत संशोधन करताना गेसर यांना लहान आकाराच्या बियांची निर्मिती करणारा जनुक सापडला आहे. त्यामुळे या जनुकासंबंधीच्या संशोधनाचा फायदा बीनबियांच्या सीताफळाची जात विकसित करण्यासाठी होईल असा शास्त्रज्ञांना विश्वास वाटतो.बाजारपेठेतील वाढत मागणी लक्षात घेऊन छत्तीसगड राज्य सरकारने लाख निर्मिती आणि दर्जेदार उत्पादनासंदर्भात संशोधन केंद्र सुरू करण्याचे ठरविले आहे. देशातील लाख उत्पादनामध्ये छत्तीसगडचा वाटा ४२ टक्के आहे. दरवर्षी या राज्यात सुमारे सात हजार टन लाखेचे उत्पादन होते. छत्तीसगडच्या बरोबरीने झारखंडमध्येही लाखेचे उत्पादन घेतले जाते. लाखेचा उपयोग व्हार्निश निर्मितीसाठी होतो. संशोधन केंद्राच्या उभारणीबाबत माहिती देताना राज्याचे वनमंत्री विक्रम उसंदी म्हणाले की, राज्यात लाख निर्मिती उद्योगाला चालना देण्यासाठी ग्रामीण भागातील युवक गटांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. याचबरोबरीने जंगल उत्पादनांची विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांनाही या प्रकल्पामध्ये सामील करून घेण्यात आले आहे. या उद्योगामुळे वन परिसरात राहणाऱ्या लोकांना लाख उद्योगातून आर्थिक स्रोत निर्माण होईल. युवक गटांच्या बरोबरीने शाळांमध्येही लाख निर्मिती उद्योगाबाबत माहिती देण्यात येणार आहे. येत्या काळात वन आधारित उत्पादनांच्या गुणवत्ता वाढीसाठी आम्ही लक्ष केंद्रित केले आहे.

# दही-ताक, आहारात टाक

एखाद्या चांगल्या कामासाठी आपण बाहेर पडतो, तेव्हा बरेचदा तणावात असतो. अशा वेळी दही-साखर हातावर द्यायची प्रथा आहे. हे थंड असल्याने शरीराला, मनाला थंडावा मिळतो. मन शांत होते, चित्त एकाग्र होते आणि याचा परिणाम आपल्या कामावर होतो. एकूणच, दूध, दही आणि ताक यांचा इतिहास अत्यंत जुना आहे, अगदी लोक वसाहत करून एकत्र राहू लागलेत्या काळापासून यांची नोंद सापडते. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये अनेक महत्त्वाचे पोषकघटक असल्याने ते पूर्णान्न मानले जाते; त्यामुळे गायीलाही वंदनीय समजले जाते.केवळ दुधच नाही, तर गोमूत्र, शेणखत यांचा वापर नैसर्गिक खते, औषधे, कीटकनाशक यासाठीही आधीपासून होत आलाय. उगीच नाही, आपल्या पूर्वजांनी अग्निहोत्र, होमहवन यासाठी गायीच्या शेणाच्या गोवऱ्या, तूप वापरण्याची पद्धत अमलात आणली. गायी-म्हशीच्या दुधाबाबत अनेक गोष्टी आपल्या कानावर पडतात. गायीने जास्त दूध द्यावे म्हणून देण्यात येणारे हॉर्मोन इंजेक्शन, गोठ्यातील अस्वच्छता, अँटिबायोटिक्सचा वापर यामुळे दूध पिण्यावर प्रश्न निर्माण होतोय. आज काल दूध न घेण्याबद्दल बरेचदा बोलले जाते; परंतु दुधाऐवजी आपण दही किंवा ताक घेतले, ते आरोग्यासाठी नक्कीच चांगले आहे. सगळ्यांत उत्तम म्हणजे स्वतःकडे देशी गाय असणे किंवा असणाऱ्याकडून दूध घेणे. १०० ग्रॅम दुधामधून आपल्याला साधारणपणे ३.५ ग्रॅम प्रोटीन मिळते. याच्यामध्ये सगळ्या प्रकारचे ॲमिनो ॲसिड असल्यामुळे हे प्रोटीन उच्च गुणवत्ता असलेले मानले जाते.दुधामध्ये 'लॅक्टोज' नावाची नैसर्गिक साखर असते; तसेच गायीच्या दुधामध्ये म्हशीच्या दुधापेक्षा चरबीचे प्रमाण थोडे कमी आणि कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. गायीच्या दुधामध्ये बीटा कॅरोटीन म्हणजेच जीवनसत्त्व अचे प्रमाण जास्त असते; त्यामुळे गायीचे दूध हे म्हशीच्या दुधापेक्षा पिवळसर दिसते. प्रत्येक प्राणीजन्य पदार्थांमध्ये जीवनसत्त्व बी १२चे प्रमाण जास्त असते; तसेच ते दुधामध्येही जास्त असते. तरीही बी १२ मिळण्याच्या बाबतीत आपण दुधावर खूप अवलंबून राहू शकत नाही. मांसाहार करणारे किंवा दुधजन्य पदार्थ खाणाऱ्यांमध्येही बी १२चे प्रमाण कमी असते; कारण त्याच्या शोषणाला आतड्यात चांगल्या जीवजंतूंची गरज असते. दुधावर वेगवेगळे संस्कार होतात, तेव्हा त्यातून दही, ताक, लोणी या सगळ्या गोष्टी तयार होतात. शक्यतो घरी बनवून हे पदार्थ आपण खाल्ले, तर ते जास्त चांगले; कारण बाहेरच्या दही, ताकामध्ये बरेचदा प्रिझर्वेटिव्ह घातलेले असतात, त्यामुळेच ते भरपूर दिवस टिकतात.दुधाला विरजण लावले जातो, तेव्हा दही तयार होते. दही हे भारतीय आहारातील महत्त्वाचा भाग मानला जातो. अनेक पदार्थांसाठी आपल्याला दही लागते. दह्याची स्वत:ची अशी विशेष चव आहे; शिवाय दुधापेक्षा ते पचायलाही चांगले असते. दुधापेक्षा दह्यामध्ये पोषक घटक जास्त आहेत, असे मानायला काही हरकत नाही. बऱ्याच लोकांना दूध पचत नाही, याचे कारण म्हणजे दुधामधली साखर. यात 'लॅक्टोज' नावाची जी साखर असते, ती ज्यांना 'लॅक्टोज इन्टॉलरन्स' आहे, त्यांना पचत नाही. पोट बिघडणे किंवा इतर काही ॲलर्जी होणे या



लोकांमध्ये आढळून येते. याला पर्याय म्हणून दही उत्तम; कारण दही लावताना या 'लॅक्टोज'चे रूपांतर लॅक्टिक ॲसिडमध्ये होते; तसेच त्यातील प्रथिनेही बदलतात. दही लागल्यानंतर दुधामधले स्निग्ध पदार्थ एकत्रित होऊन दह्याच्या पृष्ठभागावर येतात. दही लावायला काही चांगले बॅक्टेरिया मदत करत असतात. हे बॅक्टेरिया 'लॅक्टोबॅसिलस' आणि 'स्टेप्टोकोकाई' असतात. चांगले दही लावण्यासाठी योग्य विरजण आणि योग्य तापमानाची आवश्यकता असते. दूध जास्त तापवले, तर त्याच्यामध्ये बॅक्टेरिया वाढू शकत नाहीत आणि दही लागू शकत नाही.विरजण खराब असेल आणि त्यामध्ये इतर जंतू जसे, की इस्ट मोल्ड किंवा गॅस तयार करणारे काही बॅक्टरिया असले, तर दही चांगले लागणार नाही. असे असले, तर त्या दह्याला चांगला वासही येणार नाही. दह्याचा पृष्ठभागाला चिरा पडलेल्या दिसतील आणि त्याच्यातून बुडबुडेही येताना दिसतील. याचा परिणाम दह्याच्या गुणवत्तेवर आणि त्याचबरोबर त्याच्या चवीवरही होतो.वातावरणातील तापमानाचाही दही लावण्यावर परिणाम होतो. जसे, की थंडीच्या दिवसांत दही विरजायला वेळ लागतो. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये मात्र दही लवकर विरजते. मातीच्या भांड्यामध्ये दही लावले, तर ते अजून छान लागते. त्याची चवही वेगळी लागते.

दही खाण्याचे फायदे

१. दह्यामुळे हाडे आणि दात मजबूत होतात. सर्व दुग्धजन्य पदार्थांप्रमाणेच दह्यामध्ये कॅल्शियम भरपूर असते, जे हाडे मजबूत करण्यासाठी आणि दातांसाठी आवश्यक असते. कॅल्शियमव्यतिरिक्त दही फॉस्फरसनेही समृद्ध आहे. एकत्रितपणे ते हाडांच्या वाढीची प्रक्रिया जलद करतात आणि संधिवात, ऑस्टिओपोरोसिस रोखण्यात मदत करतात.

२. दही पोटाजवळची वाढलेली चरबी कमी करायला मदत करते. सध्या लोकांना भरपूर ताण असतो. 'कॉर्टिसॉल' नावाचे हार्मोन ज्याला 'स्ट्रेस हार्मोन' असेही म्हणतात, जे चरबीच्या पेशींना पोटाभोवती अधिक चरबी निर्माण करण्यास प्रवृत्त करते.

दर रोज एक वाटी दही खाल्ल्याने शरीरातील कॅल्शियमचे प्रमाण वाढते, जे 'कॉर्टिसॉल' मर्यादित करते; त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

३. दह्यामध्ये प्रोटीन असल्यामुळे कमी झालेल्या वजनानंतर शरीरातील मासपेशी टिकवून ठेवते; त्यामुळे फॅट लॉस; पण त्याबरोबर मसल लॉस न होता स्नायू पेशी अबाधित राहतात किंवा वाढीस लागतात.

४. दह्यातील प्रो-बायोटिक्स पचनास मदत करतात. दही हे प्रो-बायोटिक्स (चांगले बॅक्टेरिया) समृद्ध असल्याने पचनशक्ती सुधारते; कारण ते पचनमार्गातील सर्व हानिकारक जीवाणू नष्ट करते आणि चांगल्या जीवाणूंच्या प्रसारास मदत करते. 'प्रो-बायोटिक्स इरिटेबल बोवेल सिंड्रोम'मुळे पोट फुगणे आणि पोटदुखी यांसारख्या पाचक समस्यांपासून संरक्षण करण्यासही दही मदत करते. ज्यांना दूध पचत नाही, त्यांच्यासाठी दही हा खूप चांगला पर्याय आहे. पोट बिघडलेले असेल, अतिसार होत असेल, तर दुधाऐवजी आपण दहीभात किंवा नुसते दही खाल्ले, तरी ते पोटाला चांगले असते.

५. दही रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. एक कप दह्यामध्ये चांगले बॅक्टेरिया असतात, जे जंतूंशी लढण्यासाठी आवश्यक असतात; त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती मजबूत राहते. काही बायकांना वारंवार 'व्हजायनल इन्फेक्शन' होण्याचा त्रास असतो. त्यांनी दर रोज एक वाटी दही खायला हवे. दह्यामधील चांगले बॅक्टेरिया योनीमार्गामध्ये वाढणाऱ्या इस्ट इन्फेक्शनला कमी करायला मदत करतात.

५. त्वचा आणि केसांसाठी दही अत्यंत फायदेशीर आहे. दह्याचा उपयोग त्वचेला लावण्यासाठी किंवा केसांना लावण्यासाठीही केला जातो; त्यामुळे त्वचा उजळते आणि मऊही राहते; तसेच त्वचेवरील सुरकुत्या कमी व्हायला त्याची मदत होते. केसांना दह्याचा पॅक योग्य पद्धतीने लावला, तर केस मऊ होतात.दह्यापेक्षा ताक हे जास्त मधुर असते आणि त्यामध्ये पाण्याचे प्रमाण थोडे जास्त असते. पोषक घटकांचा विचार केला, तर दही आणि ताकामध्ये सारखेच पोषक घटक आहेत; परंतु दही हे काही जणांना ताकापेक्षा पचायला थोडे जड वाटू शकते. ताक पाचक असल्याने जेवण झाल्यावर आपल्याकडे ताक पिण्याची पद्धत आहे.बरेचदा असे सांगितले जाते, की दही सकाळी खावे आणि रात्री ताक प्यावे. त्याचे कारण हेच, की दह्यामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असते आणि ताकामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते पचायला थोडे हलके होते; म्हणूनच रात्री ताक पिण्याचा सल्ला दिला जातो. उन्हाळ्यामध्ये जेव्हा तहान तहान होते; त्यावेळी ताक हा एक उत्तम पर्याय आहे. विशेष करून, ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनाही दह्याऐवजी ताक पिण्याचा सल्ला दिला जातो.

**-अर्चना रायरीकर**

# इतिहासाचे प्रतिबिंब वर्तमानात कधी?

प्रभावशाली नौदल ज्या देशाकडे त्याच्या वर्चस्वाचा परिघही तितकाच मोठा असतो. हे लक्षात घेता भारतीय नौदलाचे आधुनिकीकरण आणि त्यासाठी निधीच मोठी तरतूद गरजेची आहे.प्रभावशाली नौदल ज्या देशाकडे त्याच्या वर्चस्वाचा परिघही तितकाच मोठा असतो. हे लक्षात घेता भारतीय नौदलाचे आधुनिकीकरण आणि त्यासाठी निधीच मोठी तरतूद गरजेची आहे.दरवर्षी ४ डिसेंबर रोजी साजरा होणारा नौदल दिन यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमाराचे प्रतिक असणाऱ्या सिंधुदुर्ग येथे मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. आपल्या भाषणात पंतप्रधानांनी भारतीय आरमाराच्या आणि शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा मागोवा घेतला.नित्यनियमाने अशा प्रकारच्या सोहळ्यात एखादी नवीन लोकप्रिय घोषणा करायची या प्रथेप्रमाणे नौदलातील हुद्द्यांचे (रँक) भारतीय संस्कृतीनुसार नामकरण करण्याची घोषणा देखील पंतप्रधानांनी केली. परंतु मुख्य गोष्ट ही हुद्द्याच्या नामकरणाची नसून नौदलाच्या संक्रमणाची आहे. आश्वासनाची भरती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत मात्र ओहोटी हे भारतीय नौदलाच्या वाटचालीचे कटू वास्तव आहे. नौदल दिन साजरा करत असताना या वास्तवाची जाणीव असणे गरजेचे आहे.'जो समुद्रावर अधिपत्य प्रस्थापित करेल, तो जगावर प्रभुत्व निर्माण करेल', अशा आशयाचे गृहीतक जागतिक राजकारणात प्रचलित आहे. गेल्या काही काळात जागतिक राजकारणात झालेल्या गुणात्मक, संख्यात्मक आणि रचनात्मक बदलांत देखील या गृहीतकाचे महत्त्व अनन्यसाधारण राहिले आहे. एकोणीसाव्या शतकात ब्रिटन किंवा विसाव्या शतकात अमेरिकेने जे वर्चस्व प्रस्थापित केले ते सागरी शक्तीच्या बळावर.इतकेच नव्हे तर ब्रिटनच्या अधिपत्याचा सूर्यास्त झाला तो हिंद महासागरावरील अधिपत्य गमावल्यामुळे. आजही अमेरिकी वर्चस्व लयाला जात असल्याची व चीनच्या उदयाची जी चर्चा सुरू आहे त्याचे कारण म्हणजे हिंद आणि पश्चिम प्रशांत महासागरातील चीनचे वाढत असलेले वर्चस्व यामुळेच.

भारताचे अनन्यसाधारण महत्त्व

भारताला सागरी इतिहासाची गौरवशाली परंपरा आहे. आपल्याकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि दक्षिणेकडे राजेंद्र चोला हे या परंपरेतले मोठे शिलेदार आहेत. अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांच्या मध्ये असल्यामुळे भौगोलिक दृष्ट्या हिंद महासागरात भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. हिंद महासागरातील खनिज संपत्ती आणि सागरी व्यापार याच्या दृष्टीने देखील भारताचे महत्त्व विशेष आहे.इतके असून देखील हा इतिहास आणि भूगोल एका मोठ्या कालावधीसाठी दुर्लक्षिला गेला आहे. आजही या दृष्टीने भारतीय जनमानसात फार काही उत्सुकता आहे, असे नाही. जागतिक राजकारण आणि परराष्ट्र धोरण यांच्याबद्दल असणारी जनमानसातील उदासीनता सागरी सुरक्षेबाबतीतही दिसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राष्ट्रबांधणीसाठी सागरी सामर्थ्याची असणारी गरजच शैक्षणिक व्यवस्थेने आपल्याला विशद करून सांगितलेली नाही.विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित काही संस्था, तसेच निवृत्त नौदल अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली दिल्लीस्थित 'नॅशनल मेरीटाईम फौंडेशन', पाँडिचेरीस्थित 'सेंटर फॉर मेरीटाईम स्टडीज' किंवा हैदराबादस्थित 'इंडियन ओशन स्टडीज' यांचा अपवाद वगळल्यास या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या कोणत्याही संस्था भारतात नाहीत, हे कटू वास्तव आहे.जनमानसात असलेल्या उदासीनतेचे प्रतिबिंब राजकीय पातळीवर उमटले नाही तर ते नवलच. प्रख्यात इतिहासकार के. एम. पन्नीकर यांनी 'भारत आणि हिंद महासागर: सागरी शक्तीचा भारतीय इतिहासावर असणारा प्रभाव' असा एक ग्रंथ १९५१मध्ये लिहिला होता. या ग्रंथाचे शीर्षक त्यांनी प्रख्यात अमेरिकन नाविक रणनीतीकार अल्बर्ट टेलर महान यांच्या 'सागरी शक्तीचा इतिहासावर असणारा प्रभाव १६८० ते १७८३' या पुस्तकावरून घेतले होते.या ग्रंथात महान यांनी ब्रिटिश जगावर दीर्घ काळ अधिसत्ता का गाजवू शकले, याची कारणीमिमांसा ब्रिटनचे सागरावर



असलेले वर्चस्व अशी केली होती. इतकेच नव्हे तर या ग्रंथात नमूद केलेल्या सूचना तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांच्यासारख्या शासनकर्त्यांनी नाविक धोरण म्हणून स्वीकारल्या होत्या.आज ज्याच्या जीवावर अमेरिका अधिपत्य गाजवत आहे ते डिएगो गार्सिया, बहारीन आणि फिलिपाइन्स येथील नाविक तळ, हे महान यांच्या पुस्तकांतील सूचनांची देणगी आहेत. याउलट आपल्या देशातील किती शासनकर्त्यांना पन्नीकर यांच्या या पुस्तकाची जाणीव असेल?पन्नीकर यांनी त्यांच्या पुस्तकात हिंदी महासागराचे भारताच्यादृष्टीने महत्त्व तर विशद केले आहेच; परंतु त्यांचा असा दावा आहे की भारताने आपले स्वातंत्र्य गमावले तेच मुळी सागरी सामर्थ्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे. परिणामी स्वातंत्र्यांनंतर देखील सागरी विचारांची एक मूलभूत बैठक तयार करण्यात राजकीय धोरणकर्त्या समुदायाला अपयश आले.१९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी अवलंबवलेल्या 'लूक ईस्ट' आणि 'जागतिकीकरणाच्या' धोरणांपासून सागरी धोरणांकडे बघण्याच्या भारतीय दृष्टिकोनात थोडा बदल होत गेला. परंतु तो परराष्ट्र धोरणापुरताच मर्यादित राहिला. या दोन्ही धोरणांमुळे भारताचा आग्नेय आशियातील महत्त्वाच्या देशांशी संपर्क आला.यातील बहुतांश देशांचा विकास हा सागरी सामर्थ्यावर अवलंबून असल्यामुळे साहजिकच त्यांनी आखलेल्या धोरणांचे प्रतिबिंब हे आपल्या धोरणातही उमटले. जागतिकीकरण हे खऱ्या अर्थाने फक्त सागरी घटकावरच अवलंबून असते, याची जाणीव या निमित्ताने झाली. त्यातूनच 'इंडियन ओशन नेवल सिम्पोजियम', भारत-अमेरिका यांच्यातील 'मलबार नाविक सराव', 'मिलन' हा बहुद्देशीय नाविक सराव उदयास आले.२००१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी अंदमान निकोबार बेटांवर तिन्ही सेनादलाचा तळ उभा करून नाविक दलाची भारताच्या संरक्षणातील महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात 'हिंद-प्रशांत' या नव्या भौगोलिक रचनेला मान्यता दिली.ही नवी भौगोलिक रचना एडनच्या आखातापासून सुरू होते ते थेट ऑस्ट्रेलियापर्यंत पोहोचते. १९९१च्या धोरणाचा परिणाम म्हणूनच स्वतःला हिंद महासागरापर्यंत मर्यादित ठेवणारा भारत प्रशांत महासागरात आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे..

युद्धनौका, निधीची तरतूद हवीभारतीय परराष्ट्र धोरण आणि नाविक दल हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्यक्षम आहेतच, परंतु खरी गरज आहे ती अर्थ आणि संरक्षण मंत्रालय यांच्यासह राज्यांकडून साथ मिळण्याची. इतक्या मोठ्या प्रदेशात विस्तार करावयाचा असेल तर त्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि आर्थिक निधीची आवश्यकता असते.जगातील सातव्या क्रमांकावर असणाऱ्या भारतीय नौदलाकडे सध्या फक्त 'आयएनएस विक्रमादित्य' आणि 'आयएनएस विक्रांत' या दोनच विमानवाहू नौका आहेत. नौदलाला खरी गरज तीनपेक्षा जास्त आहे. त्याची पूर्तता तातडीने करणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली गेली पाहिजे. तथापि, त्यादृष्टीने पावले पडताना दिसत नाहीत.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या वर्षी संरक्षण क्षेत्रासाठी सहा लाख कोटी रुपये मंजूर केले. निवृत्त नौदल उपप्रमुख जी. अशोक कुमार यांनी जाहीररीत्या सरकारकडे १८टक्के तरतुदीची मागणी केली होती. या उलट नाविक दलाचा अर्थसंकल्पातील वाटा हा फक्त १५% आहे. ही तरतूद १९६२च्या चीन युद्धानंतरची सर्वात कमी तरतूद आहे.जेव्हा-जेव्हा अर्थसंकल्पात संरक्षण व्यवस्थेकडे दुर्लक्ष होते तेव्हा त्याचा सर्वाधिक फटका हा नौदलाला बसतो. स्वातंत्र्यानंतर ते आजतागायत हे कटूसत्य नौदल पचवत आहे. परिणामी, हिंद-प्रशांत महासागरातील वर्चस्वाचे स्वप्न हे समुद्रातल्या लाटांप्रमाणे हेलकावे खाणारे आहे.एक देश म्हणून आजही आपण सागरी समस्या, सुरक्षितता आणि विकास या बाबींकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. पण हे दुर्लक्ष भविष्यात आपल्याला परवडणारे नाही आहे. पंतप्रधानांनी नौदलाच्या भारतीयीकरणाची घोषणा ज्या दिमाखात केली त्याच दिमाखात आगामी अर्थसंकल्पात नौदलासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी; तर आणि तरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचे प्रतिबिंब वर्तमानात उमटेल.

सह्याद्रीचा राखणदार



# वर्धा येथे सौरऊर्जेवरील फ्लड लाईट टॉवरचे ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्घाटन

## वर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी २७ कोटी रुपये;आता रात्रीदेखील खेळाडू करू शकतील सराव

**वर्धा । प्रतिनिधी**

खेळाडूंना रात्री देखील सराव करता यावा, यासाठी जिल्हा क्रीडा संकूल वर्धा येथे १ कोटी २४ लक्ष रुपये खर्च करून सौरऊर्जेवर चालणारे फ्लड लाईट टॉवर बसविण्यात आले आहे. या टॉवरचे उद्घाटन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले.उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी क्रीडा मंत्री संजय बनसोडे होते. तर खासदार रामदास तडस, आमदार डॉ. पंकज भोयर, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलिस अधीक्षक नूरूल हसन, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुनील गफाट, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले. 'वर्धा जिल्ह्यासाठी आपण 'मिशन ऑलम्पिक २०३६' डोळ्यापुढे ठेवले आहे. जिल्ह्याला ऑलिम्पिक पदक प्राप्त करून देण्याचा आपला संकल्प आहे. या संकल्पाला फ्लड लाईटच्या रुपाने प्रकाशाचा आशीर्वाद लाभला आहे. आता रात्री देखील खेळाडूंना चांगला सराव करता येईल,' असे ते म्हणाले. जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी निधी मंजूर झाल्याची माहिती क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. 'वर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी निधी मिळावा अशी मागणी आमदार डॉ.पंकज भोयर यांनी केली होती. वर्धा येथे येताना निधी मंजुरीचा आदेश घेऊन येतो, असे मी म्हणालो होतो. त्याप्रमाणे जिल्ह्यासाठी २७ कोटी रुपयांच्या



विविध क्रीडा विषयक कामांना प्रशासकीय मंजुरीचा आदेश घेऊन आलो आहे. जिल्ह्याला आणखी निधी पाहिजे असल्यास उपलब्ध करून देऊ,' अशी ग्वाही क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी दिली. त्याचवेळी मंजुरीचा आदेशही त्यांनी आमदार डॉ. पंकज भोयर यांना सुपूर्द केला.आमदार डॉ. भोयर कृतज्ञता व्यक्त करताना म्हणाले, 'फ्लड लाईटमुळे जिल्ह्यातील खेळाडूंना सरावासाठी चांगली सुविधा निर्माण झाली आहे. जिल्ह्याच्या क्रीडा सुविधांसाठी क्रीडामंत्र्यांकडे २५ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापेक्षा जास्त २७ कोटी रुपये त्यांनी मंजूर केले. प्रशासकीय मान्यता देखील उपलब्ध करून दिली. त्यामुळे पालकमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांचे आभार मानले.' तत्पूर्वी, पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार तसेच क्रीडा मंत्री श्री.बनसोडे यांनी फित कापून टॉवर चे उद्घाटन केले. त्यानंतर पालकमंत्री यांच्या हस्ते टॅावरची कळ दाबून फ्लडलाईट प्रकाशित करण्यात आले. क्रीडा संकुलाच्या चारही बाजूंना चार टॉवर उभारण्यात आल्याने रात्री देखील खेळाडूंना सराव करता येणार आहे.

## गुणवंत विद्यार्थी,ज्येष्ठ नागरिक सत्कार व युवक युवती परिचय मेळावा संपन्न



**नागपूर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय भोयर पवार महासंघ नागपुर तर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक सत्कार तसेच युवक आघाडी तर्फे आयोजित युवक युवती परिचय मेळावा दि.१० डिसेंबर २०२३ श्री. गुरुदेव सेवाश्रम सुभाष रोड नागपुर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महासंघाचे अध्यक्ष डॉ. नामदेव राऊत तर उदघाटक डॉ. विजय पराडकर अधिष्ठाता, उध्यानीकी महाविदयालय छिंदवाड़ा होते प्रमुख पाहूणे सरिता गाखरे माजी जिल्हा परिषद अध्यक्षा वर्धा ,डॉ.शितल चोपडे प्राध्यापीका पशु वैद्कीय महाविदयालय नागपुर कु. प्राजक्ता सुभाष पाठे वैज्ञानिक अधिकारी वैज्ञानिक न्याय प्रयोगशाळा नागपुर, प्रा. भगवान बन्नगरे अध्यक्ष भोयर पवार विदयार्थी मंडळ कारंजा, जियालाल शरणागत अध्यक्ष पवार समाज संघठन पश्चिम नागपुर, पृथ्वीराज रहांगडाले अध्यक्ष पवार युवक संघठन नागपुर, अशोक पाठे वर्धा शाखा अध्यक्ष, किशोर चोपडे अध्यक्ष युवक आघाडी,लता प्रमोद धारपूरे सदस्या काटोल पंचायत समिती उपस्थीत होते.

पवार समाजाची आराध्य दैवत माता गडकालीकेची महा आरती करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महासंघाची मुख पत्रिका वाटचाल २०२३ व युवक आघाडी तर्फे विवाह योग्य वर वधू ची महिती पुस्तिका भविष्याची वाटचाल २०२३ या पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.१२ वी मध्ये गुणवंत विद्यार्थी तनय बंडू डोबले,कु. अनिष्का अरुण धारपुरे, मिथिलेश धंडाळे, कु. निधी प्रमोद फरकाडे, कु .सुहानी मोरेश्वर भादे व १० वी मध्ये गुणवंत विद्यार्थी कु.गरिमा मदन कडवे कु. पुर्वा पवन चोपडे कु. जानवी चितेश्वर ढोले, कु.गौरी अरविंद हिंगवे, कु. मानसी नामदेव देशमुख ई . रोख रक्कम , प्रमाण पत्र ग्रामगीता व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला तसेच विविध शाखेतुन पदवी पदव्युत्तर लोकांचे सत्कार तसेच भोयर पवार समाजातील शासकीय सेवेतून निवृत्त व २० ज्येष्ठ नागरिकाचा सत्कार व पवार समाजातील युवा उधोजक डॉ. मोतिलाल चौधरी यांना मानद डॉक्टरेट पदवी व कु. वेदिका धंडाळे या युवतीला मिस इंडिया बंगलोर २०२१ हा किताब सन्मान मिळाल्याबद्दूल विशेष सत्कार करण्यात आला. युवक युवती परिचय मेळावा करिता विवाह योग्य २५० युवक युवतीनी परीचय दिला. या वेळी ३७ युवकानी रक्तदान करुन शिबिरकरिता अमुल्य सहकार्य केले. रक्त संकलन रेन्बो ब्लड बँकचे डॉ. रवी भांगे व टिम यांनी केले तसेच तसेच आरोग्य तपासणी शिबिर मध्ये १७० लोकांचे विविध आजाराचे तपासनी व निदान स्व. विठ्ठलराव चौधरी प्रतीष्ठान तर्फे डॉ.जयश्री चौधरी, डॉ.उदय चौधरी , डॉ.भाग्यश्री चोपडे , यांनी केले . कार्यक्रमाकरिता मधुकर चोपडे महामंत्री, सुभाष पाठे कोषाध्यक्ष, शंकर पाठेकर उपाध्यक्ष, मोहन हजारे, प्रभाकर डोबले, दिलीप बारंगे, मनोहर पठाडे सदस्य तसेच युवक आघाडीचे रामेश्वर चोपडे, नंदूभाऊ ढोबाळे, अरविंद देशमुख , प्रवीण डोंगरे, कु. प्रिया ढोबाळे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचलन मोरेश्वर भादे व आभार प्रदर्शन प्रवीण डोंगरे यांनी मानले.

## मूल येथे खैरे कुणबी समाजाचा स्नेहमिलन व सत्कार सोहळा संपन्न, समाजातील युवकांनी पुढे येण्याचे आवाहन

**मूल । प्रतिनिधी**

खैरे कुणबी समाज संघटना, मूल तर्फे स्नेहमिलन व सत्कार सोहळा कार्यक्रम थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष नत्थू पाटील आरेकर, उद्घाटक समाजाचे भूषण माजी नगरसेवक प्रभाकर भोयर, प्रमुख अतिथी जिल्हा प्रतिनिधी सुधाकर चरडुके, माजी नगराध्यक्षा प्रा.रत्नमाला भोयर, पंचायत समितीचे माजी उपसभापती दशरथ वाकुडकर, माजी प्राचार्य गजानन नागापुरे, संस्कृती साडी सेंटर चे संचालक मार्कंडी लाडवे, रयत नागरी बँकेचे अध्यक्ष निपचंद शेरकी, माजी नगरसेवक प्रशांत लाडवे, नगरसेविका विद्या बोबाटे, एकता अर्बन बँकेचे डोमाजी बट्टे, डॉ.आनंदराव कुळे, व्यापारी अशोक डंबारे आदी पाहुणे उपस्थित




होते.खैरे कुणबी समाजाचे प्रश्न, समस्या सुटाव्यात त्यावर विचार मंथन व्हावे, समाजाचे एकत्रीकरण, एकोप्याची भावना निर्माण व्हावी. समाजातील व्यक्तींचा सन्मान व्हावा. समाजातील युवकांनी पुढे यावे, आपण ज्या समाजात जन्मलो त्या समाजाला आपले देणे लागते याची जाणीव ठेवावी. समाज जागृती करिता सतत कार्यक्रम होत राहावे, अशा विविध विषयावर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात मूल तालुक्यातील खैरे कुणबी समाजातील नवनिर्वाचीत ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि मूल बाजार समितीचे नवनिर्वाचीत संचालक आदींचा सत्कार शिल्ड ,रोपटे व गुलाबाचे फुल देऊन मान्यवरांचे हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविकात माजी सिनेट सदस्य सुनील शेरकी यांनी कार्यक्रमाचा उद्देश आणि माहिती विशद केली. कार्यक्रमाचे संचालन धनराज कुळे, रीना ठाकरे तर आभार अमित राऊत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुंदर मंगर, नंदकिशोर शेरकी, अतुल तिवाडे, मनोहर शेरकी, देविदास मशाखेत्री, सुधाकर झरकर, संजीवनी वाघरे, अर्चना चावरे, सुनिता तिवाडे, भावना चौखुंडे, किरण चौधरी आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमात मूल तालुक्यातील युवक, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगू नये–जयदीप कटकमवार, प्रेस क्लब मूल चा अनुभवाचे बोल उपक्रम

**मूल । प्रतिनिधी**

आपले ध्येय निश्चित झाले आणि ध्येय पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते, मात्र विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगु नये असे मत जयदिप कटकमवार यांनी व्यक्त केले. प्रेस क्लब मूल च्या वतीने नवभारत कनिष्ठ महाविद्यालय, नवभारत कन्या विद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत 'अनुभवाचे बोल' या कार्यक्रमात जयदिप कटकमवार बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य अशोक झाडे होते. नवभारत कन्या विद्यालय मूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अल्का राजमलवार, प्रेस क्लबचे अध्यक्ष दीपक देशपांडे, कार्याध्यक्ष अमीत राऊत, उपाध्यक्ष सतिश राजूरवार मंचावर उपस्थित होते.जयदिप कटकमवार हा मूल तालुक्यातील बोरचांदली या ग्रामिण भागातील विद्यार्थांने कठीण समजली जाणारी आयआयटी परिक्षा उत्तीर्ण करून, दिल्ली येथील आयआयटीत प्रवेश घेतला. जयदिपचे यश ही मूल तालुक्यासाठी अभिमानाची बाब असून, त्यांची प्रेरणा इतर विद्यार्थाना मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.जयदिप कटकमवार यांनी आपण दहावी पासूनच आयआयटी करण्यांचे ध्येय निश्चित केले होते, चांगल्या आयआयटीत प्रवेश मिळावा यासाठी आपण परिश्रम घेतले, पहिल्या प्रयत्नात मनासारखी आयआयटी मिळाली



नाही, मात्र दुसर्या प्रयत्नात स्वप्न पूर्ण झाल्यांचे त्यांनी सांगीतले.पुष्प गुच्छ व स्मृतीचिन्ह देवून प्रेस क्लबच्या वतीने जयदिप कटकमवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय सिध्दावार यांनी केले. प्रेस क्लबच्या वतीने दीपक देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी व प्राध्यापकांच्या प्रश्नांची उत्तरे जयदीप यांनी दिली.यावेळी प्राचार्य अशोक झाडे, मुख्याध्यापिका श्रीमती राजमलवार, योगेश कटकमवार यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अमीत राऊत, संतोष गव्हारकर यांनी केले तर आभार प्रदर्शन धर्मेंद्र सुत्रपवार यांनी केले. कार्यक्रमास पत्रकार नितेश मेकर्तीवार, मंगला बोरकुटे यांचेसह प्रा. कामडी, प्रा. पुस्तोडे, प्रा. काटकर, प्रा. उगेमुगे, प्रा. सौ. कामडी, प्रा. सौ. सुरभी वैरागडे यांचेसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## हृदयाचे व्हॉल्व निकामी झालेल्या तरुणासाठी ना. सुधीर मुनगंटीवार ठरले देवदूत

### २२ वर्षीय तरुण अंबोरे याचे दोन्ही व्हॉल्व झाले होते निकामी;मुंबईतील ब्रीच कँडी इस्पितळात यशस्वी शस्त्रक्रिया; १९ लाख रुपयांचा खर्च

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अंबोरे कुटुंबाचा भंगार विक्रीचा व्यवसाय. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची. अशात २२ वर्षीय मुलगा तरुण आजारी पडला. त्याच्या हृदयाचे दोन्ही व्हॉल्व निकामी झाले. हातात पैसा नाही आणि कुटुंबाचं भविष्य असलेला तरुणही आजारी. अशा परिस्थितीत विवंचनेत सापडलेल्या पालकांनी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे धाव घेतली. संकटात सापडलेल्या आईवडिलांची अवस्था ना. श्री. मुनगंटीवार यांना बघवली नाही. त्यांनी तातडीने सूत्रे हलविली आणि तरुणवर मुंबईतील पंचतारांकित इस्पितळात यशस्वी शस्त्रक्रिया झाली. तरुणसाठी देवदूत ठरलेल्या ना. मुनगंटीवार यांचे आभार मानताना अंबोरे कुटुंबियांच्या डोळ्यांच्या कडा पाणावलेल्या होत्या.गोंडपिपरी येथे राहणारा तरूण साहेबराव अंबोरे (वय २२) हा मूळचा नांदेड जिल्ह्याचा रहिवासी. गेल्या १६ वर्षांपासून अंबोरे कुटुंब गोंडपिपरी येथे



वास्तव्यास आहे. तरूणच्या आईवडिलांची आर्थिक परिस्थिती सुरुवातीपासूनच बेताची आहे. त्यामुळे ते भंगाराचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवतात. तरूणला लहानपणापासून हृदयाचा त्रास आहे. २००६ मध्ये त्याचावर शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात आली. परंतु पुढील औषधोपचाराचा खर्च तरूणच्या आईवडिलांना पेलवत नव्हता. अशात तरुणची प्रकृती खालावत गेली व त्याच्या हृदयाचे दोन्ही व्हॉल्व निकामी झाले. २०१८ पासून त्याच्या त्रास खूप जास्त वाढला. आपल्या पोटच्या गोळ्याला तडफडताना बघून तरुणच्या आईवडिलांना काय करावे ते सूचत नव्हते. अशात त्यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य अमर बोडलावार यांच्याशी संपर्क साधला. तरुणला वाचविण्यासाठी एकच व्यक्ती मदत करू शकते आणि ती म्हणजे ना. सुधीर मुनगंटीवार, याची पूर्ण जाणीव बोडलावार यांना होती. त्यांनी तरूणच्या आईवडिलांना तातडीने ना. मुनगंटीवार यांच्याकडे नेले. आपली कैफियत सांगत असताना तरूणच्या आईवडिलांचा कंठ दाटून आला. ना. मुनगंटीवार यांनी तरुणच्या पालकांच्या पाठीवर आधाराचा हात ठेवला. तरुणच्या आईवडिलांचे थरथरणारे हात हातात घेऊन आपण पूर्ण शक्तीने मदत करेन असा शब्द ना.मुनगंटीवार यांनी दिला. आणि केवळ शब्द देऊन थांबतील ते ना.सुधीर मुनगंटीवार कसे. त्यांनी तात्काळ आरोग्य सहाय्यक सागर खडसे यांना यासंदर्भात मदत करण्याच्या सूचना दिल्या.

**जीवन–मरणाशी संघर्ष**

स्वत: जातीने लक्ष घालत ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी तरुणच्या उपचारासाठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून घेतली व त्याला मुंबईला रवाना केले. अलीकडेच मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात डॉ. सुरेश जोशी यांनी तरुणच्या हृदयावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्यासाठी जवळपास १९ लक्ष रुपयांचा खर्च आला. शस्त्रक्रियेनंतर तरुणची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जीवन मरणाशी संघर्ष करीत असलेल्या आपल्या लेकराला स्वस्थ पाहून त्याच्या आईवडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. पाणावलेल्या डोळ्यांनीच त्यांनी देवदुतासारखे धावून आलेल्या ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.

## टेमुर्डा येथे शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात मनसेचे रस्तारोको आंदोलन

# कर्जमाफी, अतिवृष्टी, पूरबुडाई व पीक विम्याचे अनुदान देण्यास टाळाटाळ करणाऱ्या सरकाराच्या विरोधात शेतकऱ्यांचे रास्तारोको


**वरोरा /प्रतिनिधी**

राज्यात तीन पक्षाचं शिंदे सरकार हे आश्वासने देऊन सुद्धा त्याची पूर्तता न करता उलट शेतकऱ्याचा त्यांनी एक प्रकारे छळ चालवला आहे. कारण चालू हंगामात अतिवृष्टी, पूरबुडाईची नुकसान भरपाई देण्याची घोषणा करून सुद्धा ते पैसे दिले नाही व पीक विम्याचे पैसे सुद्धा इन्शुरन्स कंपन्याकडून दिल्या गेले नाही. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असुन हातात आलेले सोयाबीन गेले कापसाला भाव नाही आणि सरकारची मदत सुद्धा नाही त्यामुळं शेतकरी गळ्याला फास लावण्याच्या स्थितीत पोहचले आहे. दरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजना राबवली होती त्यापासून वंचित साडेसहा लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी आजपर्यंत केली नाही, त्यात वरोरा भद्रावती क्षेत्रातील जवळपास ५ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला नाही आणि आता अतिवृष्टी, पूरबुडाई व पीक विम्याचे अनुदान जाहीर करून सुद्धा ते पैसे शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते वाहतूक सेना राज्य उपाध्यक्ष सुधीर खापणे यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष राहुल बालमवार, जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष आनंद बावणे यांच्या नेतृत्वात वरोरा तालुक्यातील टेमुर्डा येथे दिनांक १२ डिसेंबर ला दुपारी १२ वाजता रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी टेमुर्डा परिसरातील शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी सन २०१७ ला छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजना राबवून शेतकऱ्यांचे दीड लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्याचे जाहीर केले होते, परंतु त्यात चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील जवळपास साडेसहा लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी त्यावेळी झाली नव्हती, त्यामुळे या कर्जमाफी पासून वंचित शेतकऱ्यांनी सरकारकडे अनेकदा पाठपुरावा केला व काही शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली, दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सरकारला कर्जमाफी पासून



वंचित शेतकऱ्यांना त्वरित कर्जमाफी देण्याचे आदेश दिले होते. मात्र मागील पाच वर्षांपासून शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, दरम्यान कर्जमाफी करिता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दोन वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे आणि चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देवेंद्र फडणवीस यांनी येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेचे पोर्टल सुरू करू व त्यांच्या खात्यात पैसे टाकू अशी घोषणा केली होती परंतु आता हिवाळी अधिवेशनात कुठलाही आमदार शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर गंभीर नसल्याने व यावर्षी झालेली अतिवृष्टी व पूरबुडाई व पीक विम्याचे पैसे सुद्धा शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांचा आवाज पोहचावा व ह्या शिंदे, फडणवीस व अजित पवार सरकारला जाग यावी यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे स्थानिक वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांना घेऊन मंगळवार ला नागपूर - चंद्रपूर मार्गावरील टेमुर्डा येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला यशस्वी करण्यासाठी मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे, वाहतूक सेना जिल्हा अध्यक्ष उमाशंकर तिवारी, जनहीत कक्ष विभाग जिल्हा अध्यक्ष सुनील गुढे, रमेश काळबांधे, संजय रेड्डी, विशाल देठे, राम पाचभाई, रेवती इंगोले, मोहित हिवरकर, प्रशांत बदकी, संजय काटकर, गजू वादाफाळे, मनोज गाठले, राजेंद्र धाबेकर, युगल ठेंगे, धनराज बाटबरवे, सुनील पाझारे, प्रतीक मुडे, महेंद्र गारघाटे, रामा डुकसे, अशोक दाते, भदुजी गिरसावळे. सुधाकर ठाकरे,गुलाब गुळघाणे, शेखर कारवटकर इत्यादींनी परिश्रम केले.

## उप जिल्हा रुग्णालय वरोरा येथे जागतिक सिकलसेल सप्ताहाचे आयोजन व उद्घाटन



**वरोरा /प्रतिनिधी**

११ डिसेंबर २०२३ ला उप जिल्हा रुग्णालय वरोरा येथे जागतिक सिकलसेल सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी डॉ.विरुडकर वैद्यकीय अधिकारी, वंदना विनोद बरडे सा. अधीसेविक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोल्हे यांनी केले. डॉ.विरूडकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सिकलसेल आजाराची माहिती दिली. आजार कसा होतो, काय करायला पाहिजे इत्यादि विषयी माहिती दिली.वंदना विनोद बरडे यांनी उपाययोजना सांगितली. जीवनशैली बद्दल मार्गदर्शन केले. उदाहरणादाखल समजाऊन सांगितले. त्याचा प्रचार व प्रसार करण्यास सांगितलं.सिकलसेल ग्रस्त रुग्णाचे मनोगत घेतले. शाळकरी मुलांसोबत चर्चा केली. मुलांनी, मुलींनी उत्स्पूर्त सहभाग नोंदविला.आभारप्रदर्शन पुनम यांनी केले. या सप्ताहामध्ये शाळकरी मुलांची सिकलसेल तपासणी करून त्याच्या माहितीचा प्रचार व प्रसार केला जाणार आहे.

## पत्रकारांच्या हक्कासाठी उद्यापासून 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे लाक्षणिक उपोषण

**नागपूर । प्रतिनिधी**

पत्रकारांच्या पाल्यांना रोजगाराची संधी मिळावी, पत्रकार कल्याणकारी महामंडळ निर्माण करण्यात यावे, रेडीओ, टीव्ही आणि डिजिटल मीडियात काम करणाऱ्या मंडळींना श्रमिक पत्रकार संबोधण्यात यावे, पत्रकार हल्ला विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, पत्रकारांसाठी गृहनिर्माण वसाहत निर्माण करून प्रत्येक जिल्ह्यात १०० घरांची निर्मिती करण्यात यावी, दहा वर्षे पूर्ण केलेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती कार्ड देण्यात यावे, यासह विविध १५ मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व्हॉईस आफ मीडिया च्या वतीने उद्या बुधवार १३ डिसेंबरपासून नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान यशवंत स्टेडियम मध्ये लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असुन या लाक्षणिक उपोषणात व्हॉईस ऑफ मीडिया चे राज्यातील शेकडो पत्रकार सहभागी होणार आहेत. १८ आणि १९ नोव्हेंबर रोजी बारामती येथे व्हॉईस आफ मीडिया चे राज्य शिखर अधिवेशन पत्रकारांच्या भरगच्च उपस्थितीत पार पडले. सामाजिक बांधिलकी जोपासून विविध प्रसार माध्यमांत पत्रकारीता करणारे पत्रकार अलीकडे अनेक समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यामुळे समस्याग्रस्त पत्रकारांना शासनाकडून न्याय मिळावा, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून पत्रकारांच्या न्याय हक्कांच्या १५ विषयांवर चर्चा होऊन आवाजी मताने ठराव पारित करण्यात आले. या ठरावांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशन काळात लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार येत्या उद्या १३ डिसेंबरपासून धंतोली मधील यशवंत स्टेडियम येथे व्हॉईस आफ मीडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि राष्ट्रीय कार्यकारीणी पदाधिकारी यांचे मार्गदर्शनात पत्रकार हल्लाविरोधी समितीचे राज्य अध्यक्ष संदीप महाजन, व्हॉईस आफ मीडिया वर्धा जिल्हाध्यक्ष किशोर कारंजेकर, देवळी तालुकाध्यक्ष गणेश शेंडे, सेलु तालुकाध्यक्ष सचिन धानकुटे, किरण राऊत, मंगेश काळे, अनिल वांदीले यांचेसह व्हाईस आफ मीडियाचे राज्यातील सर्वच जिल्ह्यातील पदाधिकारी लढा पत्रकारीता आणि पत्रकारांसाठीचा हे ध्येय डोळ्यासमोर ठेवुन दररोज लाक्षणिक उपोषणास बसणार आहेत. उद्यापासुन सुरू होणाऱ्या लाक्षणिक उपोषणापुर्वी पत्रकारांच्या न्याय मागण्यांसाठी व्हॉईस आफ मीडिया च्या वतीने दोन वेळा तालुका व जिल्हास्तरावर धरणे आंदोलन करण्यात आले, परंतु शासनाकडून पाहीजे त्या प्रमाणात प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी हिवाळी अधिवेशनात पत्रकार एकतेचे चित्र शासन आणि समाजासमोर दाखविण्याचा निर्धार केला आहे. उद्यापासुन सुरू होणाऱ्या लाक्षनिक उपोषणात राज्यातील सर्व पत्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन व्हॉईस आफ मीडिया चे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, राज्य समन्वयक सुनिल कुहीकर, राज्य संघटक आनंद आंबेकर आणि विभागीय अध्यक्ष मंगेश खाटीक यांनी संयुक्तरित्या केले आहे.

## संत ज्ञानदेव संजीवन समाधी दिनानिमित्त व्याख्यान

### विवेकानंद महाविद्यालयात आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्यावतीने संत ज्ञानदेव संजीवन समाधी दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यशवंतराव शिंदे कनिष्ठ महाविद्यालय, भद्रावती येथील डॉ. सुधीर मोते यांनी संत ज्ञानदेव संजीवन समाधी सोहळा दिनानिमित्त 'संत ज्ञानदेवाचा मानवतावादी दृष्टिकोन' या विषयावर विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान दिले. समाधी, देहत्याग, वेदांचे पठण व अध्ययन, त्यात त्रैवर्णिकांचे प्रस्थ, वेदांची विषमतावादी दृष्टी, अशा वेदांची 'कृपण' अशी संभावना करून दिलेला धक्का, संत ज्ञानदेवांची विश्वव्यापक दृष्टी, मानवता धर्म, पसायदानाची कालातीत उपयुक्तता, पसायदानातील मानवतावादी दृष्टी,




मानवतेच्या समतेची, मानवतेच्या ममतेची भूमिका, अशा अनेक मुद्यांना स्पर्श केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नामदेव उमाटे होते.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.अमोल ठाकरे,संचालन डॉ.ज्योती राखुंडे, आभारप्रदर्शन सोनाली तायडे हिने मानले. विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे यांच्या मार्गदर्शनात समाजशास्त्र विभागामार्फत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरळ सेवा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात मोफत बस सेवा द्या

### आमदार प्रतिभा धानोरकर यांचे मुख्यमंत्र्याना निवेदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन राज्य शासनाने ७५ हजार पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्याचे घोषित केले होते. शासनाने परीक्षा शुल्कात देखील वाढ केली आहे. ग्रामीण भागातून मोठ्या शहरात जाण्याकरिता अधिकच्या आर्थिक भुर्दंड भावी अधिकाऱ्यांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे सरळ सेवा परीक्षेसाठी मोठ्या शहरात तरुणांना जाण्याठी मोफत बस सेवा देण्याची लोकहितकारी मागणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनातून केली.या निवेदनात आमदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की,



सरळ सेवा परीक्षेसाठी राज्यातील अनेक तरुण मोठ्या शहरात जातात. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी मोठ्या मेहनतीची आवश्यकता असते. मात्र, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या तरुणांना या परीक्षेसाठी जाण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे या तरुणांना मोफत बस सेवा देण्याची मागणी त्यांनी केली.या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी असेही म्हटले की, महाराष्ट्रात कुठेही परीक्षा देण्याकरिता बस प्रवास मोफत करावा. यामुळे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या तरुणांना मोठा दिलासा मिळेल. आमदार प्रतिभा धानोरकर यांची ही मागणी स्वागतार्ह आहे. या मागणीमुळे महाराष्ट्रातील अनेक तरुणांना मोठा फायदा होईल.

## घुग्घुस शहरातील वेकोलिच्या मोठ्या तलावाचे खोलीकरण व सौंदर्यीकरण करा- विवेक बोढे

**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस शहरातील वेकोलिच्या मोठया तलावाचे खोलीकरण व सौंदर्यीकरण करा अशी मागणी माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी केली आहे.जिओसी बंकरच्या बाजूला वेकोलिचा मोठा तलाव आहे. हा तलाव वेकोलि व शहरासाठी पाण्याचा मोठा स्रोत आहे. वेकोलिच्या ओव्हर बर्डनमुळे हा तलाव उथळ झाला आहे. ओबी मुळे तलावाचा आकार लहान झाला आहे.अगोदर कोळी समाज बांधव या तलावात मोठ्या प्रमाणावर मासेमारी करायचे परंतु तलावाचे पाणी घाण झाल्याने मासेमारी व्यवसाय ठप्प झाला आहे. कोळी समाज बांधवांसमोर उपजीविकेची मोठी समस्या उत्पन्न झाली आहे.वणी क्षेत्राचे



महाप्रबंधक उदय कावळे असतांना तलावाचे खोलीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. थोडेफार कामही झाले परंतु अवकाळी पावसामुळे काम बंद पडले. तलावाचे खोलीकरण केल्यास पाण्याची पातडी वाढणार आहे त्यातून कोळी बांधवांना रोजगार मिळणार आहे.हि समस्या लक्षात घेत कोळी बांधवांनी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांची भेट घेतली व आपल्या समस्या सांगितली.त्याअनुषंगाने भाजयुमो विवेक बोढे यांनी कोळी बांधवांसह न.प.कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली व चर्चा केली आणि निवेदन देऊन मागणी केली.यावेळी माजी सरपंच संतोष नुने, सिनू इसारप, मल्लेश बल्ला, अमोल नागपुरे, दिपक कामतवार, मारोती मांढरे, सचिन कोंडावार, हेमंत पाझारे, किसन कामतवार, वसंता कामतवार, संदीप कामतवार, मारोती बोरवार, अंकुश कामतवार, बंडू शिवरकर, संतोष कामतवार, मंगेश नागपुरे, शंकर कामतवार, वाल्मिक मांढरे, राजू मांढरे, राकेश कामतवार, आशिष कामतवार, राहुल मांढरे, सुनील मांढरे, दिलीप मांढरे, नागेश्वर नागपुरे, गणेश कामतवार, परमेश्वर कामतवार, गणेश नागपुरे, आकाश कामतवार, नंदकिशोर कामतवार, कार्तिक नागपुरे व मोठया संख्येत समाज बांधव उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .